ज्ञानसत्र १४५ वे
विषय : गांधीजी आज का आठवत राहतात?
वक्ते : न्या. (नि.) नरेंद्र चपळगावकर
वेळ : ६.३० स्थळ : टिळक स्मारक मंदिर.



केसरी बालकुंज
पान १० वर

वर्ष : १३९
Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57

# केसरी

राष्ट्रीय ठेवा
• अंक १३३ • पृष्ठे : १० • चार रुपये • गुरुवार १६ मे २०१९, पुणे C (शहर आवृत्ती)

### आता सर्जिकल स्ट्राइक विशेष दल

**नवी दिल्ली** : दहशतवादाचा वाढता धोका लक्षात घेता भविष्यात सर्जिकल स्ट्राइक सारख्या कारवाया वारंवार कराव्या लागू शकतात. हीच बाब ध्यानात घेऊन सर्जिकल स्ट्राइक सारखी कारवाई आणि गुप्त मोहिमा पार पाडण्यासाठी एका नव्या विभागाची स्थापना करण्याचे काम सुरू आहे. या विशेष दलामध्ये लष्कर, नौदल आणि हवाई दलातील कमांडोंचा समावेश असेल. लष्कराच्या विशेष दलामधील मेजर जनरल रँकचा अधिकारी नव्या विभागाचा प्रमुख असेल. लवकरच या विशेष दलाचे काम सुरु होईल. या विशेष दलामध्ये सध्या नियुक्तीचे काम सुरू आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

# प.बंगालमध्ये प्रचाराचा कालावधी घटवला

## निवडणूक आयोगाचा दणका; गृह सचिवांनाही हटविले

**नवी दिल्ली** : भाजप अध्यक्ष अमित शहा यांच्या रोड शो दरम्यान झालेल्या हिंसाचारानंतर पश्चिम बंगालमध्ये रॅली आणि सभांना निवडणूक आयोगाने बंदी घातली आहे. तसेच, राज्यात लोकसभा निवडणुकीचा प्रचार मुदतीआधीच समाप्त करण्याचा अभूतपूर्व निर्णय घेतला आहे. राज्यात आज (गुरुवारी) रात्री १० वाजताच प्रचार थांबवण्याचे आदेश आयोगाने जारी केले आहेत. याबरोबरच आयोगाने कलम ३२४ लागू केले आहे. निवडणुकी दरम्यान अशा घटना पुन्हा घडल्यास कडक कारवाई केली जाईल, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

निवडणूक आयोगाने कारवाईचा दणका देतानाच पश्चिम बंगालचे अतिरिक्त पोलीस महासंचालक राजीव कुमार आणि गृह विभागाचे मुख्य सचिव अत्री भट्टाचार्य यांना पदावरुन हटवले आहे. ईश्वरचंद विद्यासागर यांच्या पुतळ्याच्या तोडफोडीची घटना दुर्दैवी असल्याचे आयोगाने म्हटले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या अंतिम टप्प्यातील प्रचार उद्या (शुक्रवारी) सायंकाळी ५ वाजता संपणार होता. मात्र, एक दिवस आधीच आयोगाने प्रचारावर बंदी घातली.

गेल्या २४ तासांतील घटना, निवडणूक अधिकाऱ्यांकडून मिळालेला अहवाल या सगळ्या बाबी लक्षात घेऊन भयमुक्त वातावरणात सातव्या टप्प्यातील मतदान पार पाडावे म्हणूनच पश्चिम बंगालमध्ये प्रचाराची वेळ २० तासांनी घटवण्याचा निर्णय घेण्यात येत असल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

***गृह मंत्रालयाचे आयोगाला पत्र***

*अध्यक्ष अमित शहा यांच्या रोड शो दरम्यान झालेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्यात पश्चिम बंगालमध्ये केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाच्या ७०० तुकड्या तैनात करण्यात याव्यात, असे पत्र गृहमंत्रालयाने निवडणूक आयोगाला लिहिले आहे.*



काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी-वढेरा यांनी बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी मतदारसंघात जोरदार शक्तिप्रदर्शन केले. त्यांच्या रोड शोमध्ये काँग्रेसचे वाराणसीमधील उमेदवार अजय राय आणि छत्तीसगढचे मुख्यमंत्री भूपेश बघेल सहभागी झाले होते.

## मान्सून केरळात ६ जूनला धडकणार

**पुणे** : तीव्र दुष्काळाने होरपळत असलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना मान्सूनच्या आगमनासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे. कारण यंदा केरळातच मान्सून उशिराने दाखल होणार आहे. त्यानंतर पुढचा प्रवास रेंगाळणार असल्याने मान्सून प्रत्यक्ष राज्यात दाखल होण्यास विलंब होणार असल्याचा अंदाज बुधवारी भारतीय हवामान विभागाने वर्तविला. मान्सूनकडून शेतकऱ्यांना दिलासा मिळणार नसल्याने दुष्काळाने होरपळत असलेला शेतकरी मात्र हवालदिल झाला आहे.

दर वर्षी १ जूनच्या दरम्यान मान्सून केरळात, तर ७ जून दरम्यान तळ कोकणात दाखल होत असतो. मात्र, यंदा तो सुमारे ६ जून रोजी केरळात दाखल होणार असल्याची शक्यता आहे. त्यामुळेच मान्सूनचा पुढचा प्रवासही लांबणार असल्याचे संकेत आहेत. मान्सून उशिराने दाखल होत असल्याने शेतीचे नियोजनही पुढे सरकणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

मान्सून ४ जून रोजी केरळात दाखल होईल, असा अंदाज मंगळवारी स्कायमेटने वर्तविला होता. तसेच देशातील चारही प्रदेशांमध्ये तो सरासरीपेक्षा कमीच असेल, असेही स्कायमेटने सांगितले आहे. स्कायमेटच्या अंदाजानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे काल भारतीय हवामान विभागाने मान्सून अंदाज व्यक्त केला. केरळच्या समुद्रकिनाऱ्यावर ६ जून रोजी मान्सून धडकेल. त्यानंतर सहा ते सात दिवसांनी मान्सून महाराष्ट्रात दाखल होतो. मात्र, यंदा केरळमध्येच उशिराने आगमन होणार असल्याने महाराष्ट्रातील आगमनही लांबणीवर पडण्याची चिन्हे आहेत.

मागील पावसाळ्यात विदर्भ, मराठवाड्यात पावसाचे प्रमाण घटले होते. यंदाही त्यात घट कायम राहणार असल्याचा अंदाज स्कायमेटनंतर भारतीय हवामान विभागानेही वर्तविला आहे. (पान ५ वर)

Vencobb
एग्स् फार्म ब्रॉयलर चिकनचा दर*
८७ रु. प्रति किलो
किरकोळ विक्रीचा दर*
जिवंत कोंबडी
११५ रु. प्रति किलो
ड्रेस्ड (स्किनसह) दर*
१४१ रु. प्रति किलो
अंड्याचा किरकोळ विक्रीचा दर*
५४ रु. प्रति डझन

## आता आरोपांचे रण!





**नवी दिल्ली** : कोलकातामधील हिंसाचारानंतर आरोपांचं रण सुरु झाले आहे! भाजप आणि तृणमूल काँग्रेस या दोन्ही पक्षांनी कोलकातामधील हिंसाचारास एकमेकांना जबाबदार धरले आहे. भाजप अध्यक्ष अमित शहा यांनी पत्रकार परिषद घेत हिंसाचारास तृणमूलच जबाबदार असून आयोगाने कारवाई करावी, अशी मागणी शहा यांनी केली. सीआरपीएफच्या जवानांमुळेच आपण वाचू शकलो, असेही शहा यांनी म्हटले आहे. तृणमूलने आपल्यावरील आरोप फेटाळून लावतानाच भाजपने बाहेरून गुंड आणले असा प्रत्यारोप केला.

केंद्रीय राखीव पोलिस दलाची सुरक्षा नसती तर मी तिथून जिवंत बाहेर पडू शकलो नसतो, मी तिथून सुखरूप निघू शकलो, हे माझे नशीबच आहे, असे शहा यांनी म्हटले आहे. रोड शोदरम्यान एक नव्हे तर तीन वेळा हल्ला झाला, तिसऱ्या हल्ल्यात जाळपोळ आणि दगडफेक करण्यात आली आणि रॉकेल भरलेल्या बाटल्याही फेकण्यात आल्या, असा गंभीर आरोप शहा यांनी केला.

भाजप केलेल्या आरोपांना तृणमूल काँग्रेसने पत्रकार परिषद घेत प्रत्युत्तर दिले. अमित शहा पश्चिम बंगालमध्ये बाहेरून गुंड घेऊन आले. भाजपच्या या गुंडानीच ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या पुतळ्याची तोडफोड केली, असा दावा करत तृणमूल काँग्रेसचे प्रवक्ते डेरेक ओ. ब्रायन यांनी याबाबतचा एक व्हिडिओ जारी केला. हा व्हिडिओ निवडणूक आयोगाकडे सादर केला आहे, असेही ते म्हणाले. भाजपने जे काही केले ते व्हिडिओतून स्पष्ट दिसते, असेही ब्रायन म्हणाले.

### मुंबई हल्ल्यातील अब्दुल मक्कीला पाकिस्तानात अटक

**नवी दिल्ली** : पाकिस्तानने जमात-उल-दावाचा प्रमुख हाफिज सईदचा मेहुणा आणि मुंबई दहशतवादी हल्ल्यातील दहशतवादी अब्दुल रेहमान मक्की याला अटक केली आहे. पंजाब प्रांतातील गुजरांवालामधून त्याला अटक करण्यात आली. काही दिवसांपूर्वीच पाकिस्तानने जमात-उल-दावा, फलाह-ए-इंसानियत फाउंडेशन आणि जैश-ए-महमदशी निगडित ११ दहशतवादी संघटनांवर बंदी घातली होती. त्यानंतर पाकिस्तानने ही कारवाई केली. मुंबईमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील मक्की मोस्ट वॉंटेड होता. या हल्ल्यात तब्बल १६६ जणांना आपले प्राण गमवावे लागले होते. मक्कीवर भडकावू भाषण करण्याचा आरोप आहे. तो जमात-उल-दावा, फलाह-ए-इंसानियत फाउंडेशनसाठी पैसा गोळा करत होता. अटकेनंतर त्याला लाहोरच्या कारागृहात ठेवण्यात आले आहे. जमात-उल-दावामध्ये हाफिज सईदनंतर मक्कीचा हुकूम चालतो. भारताविरोधात गरळ ओकण्यात तो नेहमीच आघाडीवर असतो.

## सकाळी फिरायला निघालेल्या तीन महिलांना डंपरने चिरडले



मीराबाई ढमाले



कमलाबाई ढमाले



सगुणाबाई गायकर

**ओतूर, (वार्ताहर)** : सकाळी फिरण्यासाठी निघालेल्या तीन ज्येष्ठ महिलांना पाठीमागून येणाऱ्या डंपरने चिरडले. त्यात तिन्ही महिलांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना बुधवारी सकाळी सहाच्या दरम्यान उदापूर (ता. जुन्नर) गावाच्या हद्दीत हॉटेल कुकडूकू जवळ घडली. मीराबाई सुदाम ढमाले (वय ६८), कमलाबाई महादू ढमाले (वय ६५), सगुणाबाई बबन गायकर (वय ६५) अशी या महिलांची नावे आहेत. मीराबाई ढमाले या ओतूर पिंपरी पेंढार जि.प. गटाचे सदस्य मोहित ढमाले यांच्या मातोश्री आहेत.

या तीनही महिला दररोज सकाळी फिरण्यासाठी जात. नेहमीप्रमाणे तिघीही काल सकाळी पावणे सहाच्या सुमारास नगर-कल्याण महामार्गावर रस्त्याच्या कडेने निघाल्या होत्या. त्याच वेळी नगरहून कल्याणकडे भरधाव वेगाने निघालेल्या डंपरने त्या तिघींना चिरडले. अंगावरून डंपर गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर चालक डंपरसह पळून गेला. दूध घेऊन जाणाऱ्या गवळ्यांना त्यांचा मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत पडलेला दिसला. त्यांनी तातडीने पोलिसांना कळविले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला.

ओतूर पोलिसांनी तत्काळ एक पथक कल्याण मार्गाकडे रवाना केले. या मार्गावरील बनकरफाटा येथे सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. मात्र त्या सीसीटीव्हीत वाहनाचे नंबर दिसले नाही. ओतूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक रमेश खुणे यांनी महामार्गावरील सर्व पोलीस ठाण्यात खबर दिली. दरम्यान, चालकाला वाहनासह ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथे ताब्यात घेण्यात आले. या फरारी चालकाचे नाव रियाज मचनिझर हसन रझा (वय २८ वर्षे, शिवराजपूर अंतु, प्रतापगड उत्तर प्रदेश) असे आहे. जुन्नर विभागाच्या पोलीस अधिकारी दीपाली खन्ना यांनी ही कारवाई केली.




*अटी आणि शर्ती लागू. फ्री 5 वर्षांचा ओन डॅमेज इन्शुरन्स CT100 ES, CT100 KS अलॉय. सर्व CBS आणि नॉन CBS मॉडल्स निवडक राज्यांमध्ये उपलब्ध. सर्व बजाज बाइक्सवर सर्व राज्यांमध्ये फ्री 5 इयर वॉरंटी उपलब्ध आहे. तपशीलवार माहितीसाठी कृपया www.bajajauto.com/doublebachat ला विजिट करा. कोणतीही किंवा सर्व ऑफर्स पूर्वसूचनेशिवाय बदलण्याचा किंवा मागे घेण्याचा अधिकार बजाज ऑटो लिमिटेड राखून ठेवत आहे. थर्ड पार्टी इन्शुरन्स आणि सक्तीचे पर्सनल ॲक्सिडेंट कव्हर फ्री इन्शुरन्स ऑफरचा भाग नाहीत. उल्लेखलेली इन्शुरन्स बचतीची रक्कम सेलिंग डीलर्सकडे वेगवेगळी असू शकते. **बजाज ऑटो लिमिटेड कोणत्याही प्रकारच्या इन्शुरन्स पॉलिसींच्या विक्रीमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष गुंतलेली नसते.** पेटीएम ऑफर पेटीएम आणि संबंधित डीलरच्या अटी आणि शर्तींच्या सापेक्ष. पेटीएम ऑफर केवळ निवडक प्रॉडक्ट्सवर आणि निवडक डीलरशिप्सकडेच लागू आहे. पेटीएम ऑफर डीलरच्या निर्णयानुसार उपलब्ध आहे. **फायनान्स सर्वस्वी फायनान्सरच्या निर्णयावर. प्रोसेसिंग फी अतिरिक्त.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.:** Pune • Chakan HOLEYDAYS BAJAJ 8448383269 • Phugewadi SAI SERVICE BAJAJ 8448383267 • Hadapsar GEMS BAJAJ 8448383259 • Kothrud SAI SERVICE BAJAJ 8448383266 • Shivajinagar SAI SERVICE BAJAJ 8448383264 • Wakdewadi SAI SERVICE BAJAJ 8448383265 • Talegaon Dabhade HOLEYDAYS BAJAJ 8448383269 • Baramati KAMAL BAJAJ 8929643141 • Phaltan KAMAL BAJAJ 8929643142 • Indapur SONAI BAJAJ 8929643144 • Wagholi SHREEGURU BAJAJ 8448383260 • Warje G&G BAJAJ 8448183648 • Wakad Garve BAJAJ 8448183647 • Aundh SAI SERVICE BAJAJ 7798987816, Shourya Bajaj, Chinchwad – 8929207249. **Authorised Service Centre:** Narhe 9730624316, Saswad 9673005523, Jejuri 9881411599, Navhara 9970100535, Lohegaon 9822171637, Shikrapur 9595954456, Shirur 9604352999 Kamshet 8448383269, Lonavala 9822547111, Alephata 7507571715, Manchar 8805343434, Narayangaon 9766000234, Parvati 9860868686, Nare-Ambegaon 9760624316, Khed Shivapur 9011220130, Hinjewadi 9850550022, Sinhaghad Road 9823278400, Baner 7507004008, Vishrantwadi 9168682330, Rajguru Nagar 9225613664, Bhigwan 9860712727, Warwand 7798885963, Choufulla 9860243252, Morgaon 9673005537, Kandar 9673005524, Rashin 9975704778, Mirajgaon 7774826060, Akluj 7756999799, Jeur 9922044676, Sangola 8888109109, Karmala 8888984084, Tembhurni 9552679777.

## भीमा नदीकाठच्या २२ गावांतील उसाचे पीक धोक्यात

### शंभर कोटींचा फटका बसणार?

**सूर्यकांत आसबे**

**सोलापूर** : करजगी गावात पाण्यासाठी वणवण आहे. तीन-चार किलोमीटरवरून शेतातून पाणी आणावे लागते. एका हॉटेलसमोर काही जुनी जाणती माणसं बसली होती. दुष्काळ काय म्हणतो काका? असा संवाद केला असता, काय सांगावं सर? टबमध्ये (टोपली) अंघोळ करतो अन् त्याच पाण्याने कपडे धुतो. पाच-सहा दिवसांतून पाणी येते. तेही खारट. माणसाला सोडा, जनावराला देता येत नाही. कुणाच्यातरी शेतातून दोन-चार घागरी पिण्यासाठी पाणी आणतो. शेतातील पिके जळत आहेत. हाताला काम नाही. जगायचं कसं हा प्रश्न आहे. भीमाशंकर खसगी, जितेंद्र अनंतपुरे, सिद्धाप्पा बोळकोठगी, शिवानंद गवंडी, शिवशंकर कलमाडी, राम हेळवे हे ही व्यथा मांडत होते.

४० वर्षांत कधीच असे अवर्षण पाहिले नाही. टँकर चालू करा, रोजगार हमी योजनेची कामे चालू करा, अशी अनेकदा सरकारकडे विनंती केली. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही, असेही त्यांनी सांगितले.

राज्यातील शेवटचे गाव म्हणजे देवीकवठा. या गावाला लागून भीमा नदीचे पात्र आहे. विरुद्ध दिशेला कर्नाटकची सीमा सुरु होते. सोलापूरपासून सुमारे ६० किलोमीटर अंतरावर हे गाव. दुपारचा एक वाजला होता.

(पान ९ वर)

